International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 7.328
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 11 No. 3 Jan-Feb 2024

# महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत भटक्या विमुक्त जाती जमातीच्या आर्थिक व सामाजिक स्थितीचा चिकित्सक अभ्यास ( विषय संदर्भ- पश्चिम महाराष्ट्र)

**डॉ. गोरखनाथ वाकळे[1], गणेश मच्छिंद्र चोर[2]**
[1]मार्गदर्शक, सहाय्यक प्राध्यापक अर्थशास्त्र विभाग कै.बिंदु रामराव देशमुख कला व वाणिज्य महिला महाविद्यालय, नासिक जिल्हा- नासिक
[2]संशोधक विद्यार्थी, पदव्युत्तर अर्थशास्त्र संशोधन केंद्र सहकार महर्षी भाऊसाहेब संतुजी थोरात कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय संगमनेर जिल्हा - अहमदनगर
**Corresponding Author – डॉ. गोरखनाथ वाकळे**
**Email:** ganeshchor123@gmail.com
**DOI- 10.5281/zenodo.10726887**

**प्रस्तावना –**

भारत हा कृषीप्रधान देश म्हणून ओळखला जातो. भारतामध्ये ग्रामीण भागाती असलेले उद्योग हे हंगामी स्वरुपाचे आहेत तसेच शेती हा व्यवसाय हंगामी स्वराचा आहे. त्यामुळे वर्षभर शेतीत रोजगार उपलब्ध होत नाही. त्यातून बेरोजगारीची समस्या निर्माण होते. ग्रामीण भागाच्या विकास व्हावा, बेरोजगारांना रोजगार उपलब्ध व्हावेत, गावाकडुन शहराकडे येणारे तो गावात यावेत म्हणून ७ सप्टेंबर २००५ ला राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कायदा संसदेने संमत केला आणि २ फेब्रुवारी २००६ पासुन अकुशल कामगारांना मजुरी रोजगाराचे आश्वासन देणारी "राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना सुरु करण्यात आली. २ ऑक्टोबर २००९ ला या योजनेला महात्मा गांधीचे नाव देण्यात आले. या योजनेंतर्गत दळणवळण सोयी, भुविकास कामे, जलसंधारण, फळझाड लागवड कार्यक्रम इ. स्वरुपाची कामे हाती घेवून गावाचा सर्वांगीण विकास करून ग्रामीण जनतेचे राहणीमान उंचावणे शक्य झाले आहे.

**भटके आणि विमुक्त –**

पारंपरिक समाजात स्पृश्य, अस्पृश्य, आदिवासी यांच्यानंतर चौथाही एक समाजघटक होता. तो म्हणजे भटक्या जमाती आणि विमुक्त जमाती. उदरनिर्वाहाकरिता निवडलेल्या अगर वाट्यास आलेल्या व्यवसायानिमित्त अगर उदरनिर्वाहाच्या साधनांच्या शोधात भटकत राहणार्या लोकांना भटके म्हणतात. इंग्रजीत त्यांचा उल्लेख 'नोमॅड्स' असा करतात महाराष्ट्रामध्ये प्रामुख्याने ४२ भटक्या विमुक्त जमाती आढळतात. त्यामध्ये १४ विमुक्त जमाती आणि १८ भटक्या जमाती आहेत. विमुक्त जमातीमध्ये बेरड, बेस्तर, भामटा, कैकाडी, कांजारभाट, कटाबू, बंजारा, पाल पारधी, राजपारधी, राजपुत भामटा, रामोशी, वडार, वाघरी, छप्परबंद या जमातीचा समावेश आहे. तर उर्वरीत गोसावी, बेलदार, भराडी, भुत्ये, चित्रकथी, गारुडी, घिसाडी, गोल्ला, गोंधळी. गोपाळ, हेळवे, जोशी, काशी, कापडी, कोल्हाटी, मैराळ, भसण जोगी, नंदीवाले पांगुळ, रावळ सिक्कल. गारठाकर, वैदु, वासुदेव भोई, बहुरूपी, ठेलारी, ओतारी, धनगर, वंजारी जमातीचा समावेश केवळ भटक्या जमातीमध्ये होतो.

पश्चिम महाराष्ट्रातील अहमदनगर आणि पुणे प्रगत जिल्हे म्हणुन ओळखले जातात. अहमदनगर आणि पुणे या जिल्ह्यामध्ये भटक्या विमुक्त जमातीचे वास्तव मोठ्या प्रमाणात आढळुन येते, अहमदनगर जिल्ह्यामध्ये भटक्या विमुक्तांचे सर्वात मोठे श्रध्दास्थान मढी हे असल्याने आसपासच्या तालुक्यामध्ये भटक्या विमुक्त जमाती वास्तव करताना आढळतात. स्वतःचे कायमस्वरुपी आणि हक्काचे घर नाही. स्वतःच्या मालकीची निश्चित स्वरुपाचा उदरनिर्वाह पुरविणारी शेतीवाडी नाही. उपेक्षीत जगणे नशीबी आल्यामुळे पोट भरण्यासाठी कामाच्या निमीत्ताने गावोगाव भटकत असलेला आणि भिक्षेवर जगणारा किंवा परंपरेने चालत आलेल्या कलेच्या आधाराने स्वतःची उपजिवीका करणारा लोकसमुह अनेक वर्षापासुन महाराष्ट्रामध्ये वेगवेगळया जाती जमातीच्या नावाने जीवन जगतांना आढळतो. अशा प्रकारच्या लोक समुहाला भटकी जमात असे संबोधले जाते.

**संशोधन अभ्यासाचे महत्व –** संशोधकाने आपल्या संशोधनाचे महत्त्व पुढील प्रमाणे मांडले आहे.

१. पश्चिम महाराष्ट्रातील विशेषता अहमदनगर व पुणे जिल्ह्यातील महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत भटक्या विमुक्त जाती-जमातीच्या आर्थिक व सामाजिक स्थितीचा अभ्यास करून लाभार्थ्यांच्या आर्थिक स्थितीत झालेल्या बदलांचे अध्ययन या संशोधनाच्या माध्यमातून केले जाईल म्हणून ही संशोधन महत्त्वाचे आहे.

२. महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेचे लाभ प्रत्यक्ष या घटकापर्यंत किती पोहोचले आहेत याचा अभ्यास या संशोधनातून वास्तविक व यथार्थ रीतीने केला जाणार आहे.

३. लाभार्थ्यांना मिळणारी मजुरी अतिशय अल्प असून त्या मजुरी दरावर हे लाभार्थी आपली जीवनमान कशा पद्धतीने जगतात याचेही अध्ययन या शोध प्रबंधात करण्यात आले आहे यामुळे या संशोधनाचे महत्त्व अनन्य साधारण आहे.

४. महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेमुळे भटक्या विमुक्त जाती जमातीचे स्थलांतर कमी होऊन शिक्षणामुळे विविध रोजगाराच्या संधी प्राप्त होत आहेत. या समुदायाची भटकंती कमी होत असल्याचे दिसून येत असल्यामुळे हे संशोधन महत्त्वाचे आहे.

५. सामाजिक संशोधन हे समाज उपयोगी असावे लागते. या संशोधनामधील शिफारशी व विमुक्त जाती जमातीच्या विकास योजना व धोरणे राबविण्यासाठी शासनास उपयोगी ठरणार आहे. समाजातील नवशिक्षीत युवा पिढीला आत्मपरिक्षणातून विकासाची प्रेरणा मिळेल तसेच या विषयावर संशोधन करु इच्छिणा-या भावी संशोधकास मार्गदर्शक ठरणार आहे.

**संशोधन अभ्यासाची उद्दिष्टे –** संशोधकाने आपल्या संशोधनाची पुढील उद्दिष्टे निर्धारित केली आहेत.

१. भटक्या विमुक्त जाती जमातीचा आर्थिक व सामाजिक स्थितीचा अभ्यास करणे.

२. भटक्या विमुक्त जाती जमाती मधील लोकांचे आरोग्य, साक्षरता, दरडोई उत्पन्न यांचा अभ्यास करणे.

**सशोधन अभ्यासाची गृहीतक -**

१. महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेमुळे विमुक्त जाती जमातीतील लोकांना रोजगार उपलब्ध झाल्यामुळे त्याच्या राहणीमान दर्जात सुधारणा झाली आहे.

**सशोधन पद्धती –**

प्रस्तुत संशोधनाचा प्रकार वर्णनात्मक आणि विशेषणात्मक आहे. अहमदनगर व पुणे जिल्ह्यातील महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या लाभार्थ्यांमध्ये झालेले बदल अभ्यासले आहे.

**तथ्य संकलन -**

संशोधनासाठी माहितीचे संकलन किंवा तथ्यांची संकलन केल्यानंतर त्या आधारे माहितीची प्रमाणता आत्मनिष्ठता माहितीचे पूर्णत्व वर्गीकरण आणि तुलना विचारात घेतली जाते व त्याआधारे निष्कर्ष काढले जातात. संशोधनासाठी लागणारी माहिती किंवा तथ्य गोळा करण्याचा वेगवेगळया पद्धती आहेत त्या पुढीलप्रमाणे –

**प्राथमिक स्रोत –**

जेव्हा संशोधक हा स्वतः संशोधनासाठी लागणारी माहिती सबंधित व्यक्तीच्या मुलाखती घेऊन प्रश्नावलीच्या स्वरूपात प्राप्त करतो अशा माहितीस प्राथमिक स्रोताद्वारे माहितीचे संकलन असे म्हणतात. ही माहिती संशोधन प्रश्नावली, निरीक्षण, मुलाखत किंवा अनुसूची या पद्धतीद्वारे प्राप्त केली जाते. संशोधकाने या स्त्रोताद्वारे संकलित केलेल्या माहितीस 'फर्स्ट हॅन्ड इन्फॉर्मेशन' असेही म्हणतात कारण ही माहिती संशोधक स्वतः संकलित करीत असतो. प्रस्तुत संशोधनासाठी संशोधकांनी प्रश्नावली या तंत्राचा वापर केला आहे

**प्रश्नावली –**

प्रस्तुत संशोधनासाठी प्रश्नावली ही मिश्र स्वरूपाची तयार करण्यात आली आहे. कारण यामध्ये वेगवेगळया प्रकारच्या प्रश्नांचा समावेश आहे बंदिस्त मुक्त अशा प्रकारचे प्रश्न विचारण्यात आले आहेत. संशोधनाचे उद्दिष्ट, हेतू आणि माहिती प्राप्त करण्याची संशोधकाची अपेक्षा विचारात घेऊन संशोधन मिश्रित प्रश्नावली तयार केली आहे

**द्वितीय तथ्य किंवा स्रोत –**

संशोधनामध्ये संशोधक स्वतः प्रत्यक्षपणे माहितीचे संकलन करत नाही आणि उपलब्ध असलेल्या प्रकाशित अप्रकाशित अशा माहितीचा साहित्याचा आणि स्रोतांचा संशोधनामध्ये उपयोग करतो तेव्हा त्यास अप्रत्यक्ष श्रोताद्वारे माहितीचे संकलन असे म्हणतात यालाच दुय्यम स्रोत असेही म्हणतात. द्वितीय स्वतःमध्ये असलेली माहिती ही अगोदर प्रकाशित केलेली असते उदा. संदर्भग्रंथ, पुस्तके, वर्तमानपत्रे, मासिके, त्रैमासिके, शोधनिबंध, अहवाल, शोधप्रबंध यांचा वापर संशोधणात केला आहे.

**नमुना निवड –**

पश्चिम महाराष्ट्रातील अहमदनगर, पुणे, सातारा, सोलापुर, सांगली, कोल्हापुर या सहा जिल्ह्यापैकी अहमदनगर व पुणे या जिल्ह्याची लोकसंख्या जास्त आहे. अहमदनगर जिल्ह्यातील अनुक्रमे अकोले, संगमनेर, श्रीगोंदा व पुणे जिल्ह्यातील अनुक्रमे शिरूर, बारामती, दौंड या तालुक्याची निवड साधा यादृच्छिक नमुना निवड पध्दतीने निवड केली असुन या तालुक्यातील ज्या गावांमध्ये भटक्या विमुक्त जाती जमातीचे लोक जास्त प्रमाणात वास्तव्यास आहे अशा गावांची सोयीस्कर नमुना निवड पध्दतीने निवड केली आहे.

**नमुना निवडीचा आकृतीबंध**

| अ.नं. | जिल्हे | तालुके | भटक्या विमुक्त जाती जमाती लोकसंख्या प्रमाण | लाभार्थी नमुना निवड (५%) |
|---|---|---|---|---|
| १. | **अहमदनगर** (४५४३१५९) | श्रीगोंदा | १९४० | ९६ |
| | | संगमनेर | १५९० | ७९ |
| | | अकोले | ११२२ | ५६ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २. | पुणे (९४२९४०८) | दौंड | २३४० | ११७ |
| | | बारामती | १९१० | ९५ |
| | | शिरूर | १४४८ | ७५ |
| **एकूण** | ०२ | ०६ | १०३५० | ५१८ |

**आधार –** अहमदनगर जिल्हा जनगणना अहवाल २०११.
पुणे जिल्हा जनगणना अहवाल २०११.

**संशोधनाची व्याप्ती व मर्यादा –**

प्रस्तुत संशोधन हे अहमदनगर व पुणे जिल्ह्यापुरतेच मर्यादित आहे. त्यामुळे इतर जिल्ह्यांना या संशोधनाचे निष्कर्ष लागू पडतीलच असे नाही. संशोधनासाठी २००९-१० ते २०२०-२१ हा कालावधी निवडला आहे.

**गृहितकृत्याची सत्यता –** गृहितकृत्याची सत्यता पुढीलप्रमाणे स्पष्ट केली आहे.

१. महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेमुळे भटक्या विमुक्त जाती-जमातीतील लोकांना रोजगार उपलब्ध झाल्यामुळे त्यांच्या राहणीमान दर्जात सुधारणा झाली आहे.

$H_0$ - महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेमुळे भटक्या विमुक्त जाती-जमातीतील लोकांना रोजगार उपलब्ध झाला असला तरी त्यामुळे त्यांच्या राहणीमान दर्जात सुधारणा झाली नाही.

$H_1$ - महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेमुळे भटक्या विमुक्त जाती-जमातीतील लोकांना रोजगार उपलब्ध झाल्यामुळे त्यांच्या राहणीमान दर्जात सुधारणा झाली आहे.

Z TEST =

Significance Level – (α) = 0.05

$\mu_0$= Assume Mean २

Z-Test: Two Sample for Means

$$\frac{(\bar{x}_1 - \bar{x}_2) - (\mu_1 - \mu_2)}{\sqrt{\frac{\sigma_1{}^2}{n_1} + \frac{\sigma_2{}^2}{n_2}}}$$

| z-Test: Two Sample for Means | | |
|---|---|---|
| | सहमत आहे | सहमत नाही |
| Mean | 37.33333 | 4.5 |
| Known Variance | 1399.4 | 24.7 |
| Observations | 6 | 6 |
| Hypothesized Mean Difference | 0 | |
| Z | 2.131181 | |
| P(Z<=z) one-tail | **0.016537** | |
| z Critical one-tail | 1.644854 | |
| P(Z<=z) two-tail | **0.033074** | |
| z Critical two-tail | 1.959964 | |

वरील तक्त्यामध्ये एकूण सहा निरीक्षणे आहेत त्यामध्ये सरासरी ३७.३ नमुना संशोधनात्मक गृहीतकृत्य विधानाशी सहमत आहे तर सरासरी ४.५ नमुना असहमत असल्याचे दिसून येते .गृहित मध्यातील फरक २ असून लक्षणीय पातळी ० वापर चाचणीचा z .आहे मानली ०५. -p करूनमूल्य काढले असता असे दिसून आले कि हे मूल्य-p , .००५ पेक्षा कमी आहे ,कि होते स्पष्ट असे यावरून . गृहीतकृत्य शून्य असून स्वीकारले गृहीतकृत्य संशोधनात्मक अर्थ याचाच .आहे नाकारले, महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेमुळे भटक्या विमुक्त जाती-जमातीतील लोकांना रोजगार उपलब्ध झाल्यामुळे त्यांच्या राहणीमान दर्जात सुधारणा झाली आहे.

**महत्त्वाचे निष्कर्ष –**

प्राथमिक माहितीच्या आधारे मिळालेले महत्त्वाचे निष्कर्ष पुढीलप्रमाणे मांडले आहेत.

१. महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत भट्ट्या विमुक्त जाती जमातीच्या नमुना ५१८ लाभार्थ्यांच्या प्राथमिक माहितीच्या पाहणीत असे आढळून आले की नमुना १४.५% लाभार्थी निरक्षर नमुना २२.६% लाभार्थी प्राथमिक शिक्षण घेतलेले नमुना ३०.९% लाभार्थी माध्यमिक शिक्षण घेतलेले नमुना १४.३% लाभार्थी उच्च माध्यमिक शिक्षण घेतलेले नमुना १०.८% लाभार्थी पदवी प्राप्त आणि नमुना ६.९% लाभार्थी पदवीधर शिक्षण घेतलेले आहेत. यावरून असे स्पष्ट होते की, रोजगार हमी योजनेत माध्यमिक शिक्षण घेणाऱ्या लाभार्थ्यांचे प्रमाण सर्वाधिक

असून पदवी प्राप्त व पदव्युत्तर शिक्षण घेतलेले लाभार्थ्यांचेही प्रमाण जवळपास १८% इतके आहे याचाच अर्थ पश्चिम महाराष्ट्रात रोजगाराचा प्रश्न गंभीर स्वरूपाचा आहे.( तक्ता क्रमांक ४.१)

२. पश्चिम महाराष्ट्रातील रोजगार हमी योजनेच्या लाभार्थ्यांच्या प्रवर्ग न्याय अध्ययनातून असे आढळून येते की एनटी.ए या प्रवर्गातील २६.८% एनटी.बी २५.९% एनटी.सी २२.८% एनटी. डी २४.५% लाभार्थी असून सर्वाधिक लाभार्थी एनटी.ए या प्रवर्गातील असल्याचे संशोधनातून आढळून आले आहे. (तक्ता क्रमांक ४.२).

३. रोजगार हमी योजनेचा नमुना ५१८ लाभार्थ्यांच्या प्रमुख व्यवसायाबाबतच्या पाहणीतून असे दिसून आले की, नमुना २८.६% शेती नमुना ३७.१% शेतमजूर नमुना ११.८% बिघारी नमुना ६.५% नोकरी नमुना ६.२% बेकार नमुना ९.८% इतर मजूर या प्रकारचे व्यवसाय करत असल्याचे दिसून आले आहे. (तक्ता क्रमांक ४.४)

४. रोजगार हमी योजनेवरील नमुना ५१८ लाभार्थ्यांकडे एकूण १८३१ हेक्टर शेतजमीन असून त्यापैकी कोरडवाहू ४०.५% आणि ओलिताखालील शेतजमीन ५९.५% इतकी असल्याचे संशोधनातून आढळून आले आहे. (तक्ता क्रमांक ४.१०)

५. महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत भटक्या विमुक्त जाती जमातीतील सातवी पास १९.९% दहावी पास १५.४% बारावी पास १२.६% बीए पास ४.८ टक्के एम ए बी एड पीएचडी ३.३% लाभार्थी आहेत. ५५.४% लाभार्थी सुशिक्षित आहेत. तर ४४.६% लाभार्थी निरक्षक असल्याचे दिसून आले आहे. (तक्ता क्रमांक ४. १२)

६. महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेतील लाभार्थ्यांनी २००९-१० मध्ये सायकलसाठी सरासरी ३२५०, लाईटसाठी सरासरी २३३३, मोबाईलसाठी सरासरी ४६६६, फर्निचरसाठी सरासरी ९०००, मोटारसायकल स्कूटरसाठी सरासरी ३०८३३, गॅस व फ्रीजसाठी सरासरी २५८३ रुपये खर्च करून कुटुंबासाठी घरात या वस्तू घेतल्या आहेत. तर २०२०- २१ मध्ये सायकलसाठी ५५३३, लाईटसाठी ३०००, मोबाईलसाठी ११०००, फर्निचरसाठी ११८३३, मोटरसायकल व स्कूटरसाठी ३१६६६, गॅस व फ्रीजसाठी ४६६६ रुपये खर्च करून या वस्तू खरेदी केल्याचे आढळून आले आहे. यावरून असे आठवण येते की या प्रत्येक खरेदी केलेल्या वस्तूची भाव वाढ गेल्या दहा वर्षात झालेली आहे. (तक्ता क्रमांक ४.१३)

७. रोजगार हमी योजनेत भटक्या विमुक्त जाती जमातीतील एकूण १८३४ व्यक्ती काम करत असून त्यापैकी ७३८ (४०.२%) स्त्रिया आणि १०९६ (५९.८%) पुरुष असल्याचे संशोधनातून आढळून आले आहे. (तक्ता क्रमांक ४.१४)

८. महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत भटक्या विमुक्त जाती-जमातीच्या नमुना ५१८ लाभार्थ्यांकडे रोजगार हमी योजनेचे ओळखपत्र, कुटुंबाचे दारिद्र्यरेषेखाली यादीत नाव, आर्थिक व्यवहारासाठी बचत खाते या सुविधा १००% लाभार्थ्यांकडे असल्याचे संशोधनातून आढळून आले आहे. (तक्ता क्रमांक ४.१६)

९. पश्चिम महाराष्ट्रातील महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत भटक्या विमुक्त जाती-जमातीच्या नमुना ६५.१% लाभार्थ्यांनी बचत केली असून बचतीसाठी पतसंस्था बँक भिशी पोस्ट ऑफिस व इतर मार्गांचा अवलंब केला आहे. नमुना ३४.९% लाभार्थ्यांनी बचत केली नाही असे संशोधनातून आढळून आले आहे.( तक्ता क्रमांक ४.१७)

१०. नमुना ३७७ ७२.८% लाभार्थ्यांनी महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेमुळे भटक्या विमुक्त जाती जमातीतील लाभार्थ्यांचे स्थलांतर कमी झाली आहे असे मत मांडले. तर नमुना १४१ २७.२% लाभार्थ्यांनी महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेमुळे भटक्या विमुक्त जाती जमातीतील लाभार्थ्यांचे स्थलांतर कमी होऊ शकले नाही असे मत मांडले आहे. (तक्ता क्रमांक ४.१९)

**शिफारसी –**

पश्चिम महाराष्ट्रातील महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत भटक्या विमुक्त जाती जमातींच्या लाभार्थ्यांच्या पाहणीत या योजनेत बाबत काही त्रुटी दिसून आल्या आहेत. काही बाबी कमकुवत आहेत. त्याच्या सुधारण्यासाठी पुढील शिफारशी करण्यात आल्या आहेत.

१. महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेत मजुरीचे दर अतिशय अल्प आहेत मजुरी दरामध्ये वाढ करणे आवश्यक आहे. यासाठी केंद्र व राज्य सरकारने कायद्यामध्ये बदल करून मजुरीच्या दरात वाढ करावी.

२. महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेत मजुरी वाटप करताना दर आठवड्याला मजुरी देण्यात यावी. मजुरी देण्यामध्ये सरकारची अनियमितता व नसावी.

३. रोजगार हमी योजनेत पदवीधर उच्च विद्या विभूषित लोकांचे प्रमाण अलीकडच्या काळात वाढत असून त्यामुळे शिक्षणानुसार मजुरी देण्याचा विचार सरकारने करावा.

४. वर्षभरात किमान ३०० दिवस कामाची उपलब्धता रोजगार हमी योजनेत करणे गरजेचे आहे यासाठी सरकारने कायद्यामध्ये सुधारणा करावी.

५. दिवसभरात किमान आठ तास कामाची उपलब्धता करण्यासाठी सरकारने नियोजन करावे.

६. रोजगार हमी योजनेत शैक्षणिक गुणवत्तेनुसार रोजगाराची उपलब्धता करून देण्यासाठी सरकारने प्रयत्न करावेत.उदाहरण – निरक्षर व्यक्तींना अवजड कामे द्यावीत व सुशिक्षित व्यक्तींना ऑफिस मधील कार्यालयीन कामे देण्याचा विचार सरकारने करावा.

७. रोजगार हमी योजनेवरील अवजड कामे करणाऱ्या मजुरांना एक महिन्याचे वेतन बोनस म्हणून सरकारने देण्यात यावे.

८. रोजगाराच्या शोधात असलेल्या ग्रामीण भागातील गरजू लोकांना या योजनेची माहिती ग्रामपंचायत उपलब्ध करून द्यावी.

९. प्रसार माध्यमाद्वारे रोजगार हमी योजनेच्या विविध प्रकारच्या कामांची माहिती जनतेपर्यंत उपलब्ध करून द्यावी.

१०. भटक्या जमातीतील ज्या लोकांचे वास्तव्य एका ठिकाणी नाही अशा कुटुंबांना रोजगार हमी योजनेत कुठेही काम उपलब्ध व्हावे यासाठी सरकारने प्रयत्न करणे आवश्यक आहे.

**संदर्भ सूची -**

१. आगलावे प्रदिप (जानेवारी२०००) सामाजिक पध्दतीशास्त्र व तंत्रे, श्री साईनाथ प्रकाशन, नागपुर पान नं. १८१. १८२-
२. कुलकर्णी अपर्णा (२००१), रोजगार हमी योजना आणि स्त्रियांचा सहभाग, प्रबोधन प्रकाशन ज्योती, पृष्ठ क्र. ४७-५५,
३. देशमुख गणपतराव (२००५), रोहयोः महाराष्ट्राची आणि केंद्रसरकारची, प्रबोधन प्रकाशन ज्योती, नोव्हेंबर २००५, पृष्ठ क्र. १०-२१.
४. मुळे सुरेखा (२००५), रोहयो दुष्काळ ते देशप्रवास (विकासाचा ध्यास असलेली लोकचळवळ) लोकराज्य, महाराष्ट्र शासन, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मुंबई, जानेवारी २००६, पृष्ठ क्र. २१-२३.
५. कायंदे - पाटील गंगाधर (१५ जून २००९) संशोधन पद्धती, चैतन्य पब्लिकेशन नासिक.